# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 29/09/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

### विनयभंग

पो.स्टे. मौदा :– दिनांक २३/०८/२०२३ चे ००/०१ वा. ते दिनांक २८/०९/२०२३ चे १०/३० वा. दरम्यान **आरोपी नामे– सुमित रमेष चानोरे रा. मनिश नगर नागपूर** हा वारंवार फोनद्वारे मॅसेज द्वारे फिर्यादीचा पाठलाग करून तिला अश्लील भाषेत मॅसेज पाठवून फिर्यादीचा विनयभंग करून तिची इच्छा नसतांना तिला बोलण्यास भाग पाडून त्रास देतो व त्याचेसोबत बोलले नाही व मॅसेजला उत्तर दिला नाही तर तिला व तिच्या भावाला सुध्दा मारण्याची धमकी देतो.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ ए, ड, ५०४, ५०६ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक भुते मो. नं. ९८२२५६६१८० या करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

1) पो.स्टे. सावनेर :– दिनांक २७/०९/२०२३ चे ११.०० वा. ते २०.०० वा. सुमारास पो.स्टे. सावनेर हद्दीत फिर्यादी ही दिनांक २७/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. सुमारास कामावर गेली असता फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ७ दिवस ही घरी एकटीच होती. फिर्यादीचा भाऊ व पत्नी हे दुपारी ०२.३० वा. घरी आले असता घराला कुलुप लागलेले होते असे त्याने फिर्यादीला फोनवर सांगितले फिर्यादीला वाटले की मुलगी ही सावनेर येथे क्लासला गेली असेल नंतर रात्री ०८.०० वा. फिर्यादी घरी परत आली असता घराला कुलुप लागलेले होते. फिर्यादीने घराचे लॉक तोडून घरी आतमध्ये जावुन पाहीले असता मुलगी व तीची पर्स असलेली बॅग व आधार कार्ड घरी दिसले नाही तिचा गावातील ईकडेतिकडे, नातेवाईकांकडे फोन करून विचारले असता आमच्याकडे आली नाही असे सांगितले त्यामुळे फिर्यादीचे मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लोखंडे मो. नं. ७७२१८१४३०० हे करीत आहे.

2) पो.स्टे. बोरी :— दिनांक २८/०९/२०२३ चे ११.०० वा. ११.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादीने तिची मुलगी वय १५ वर्षे हिला “तु चांगली राहत जा. वाईट मुलांसोबत संगत करू नको’’ असे समजवित होती. तेव्हा ती काहीच बोलली नाही चुपचाप बसून होती. फिर्यादी आंघोळीकरीता गेली तेव्हा मुलगी ही घरात बसून होती. फिर्यादी आंघोळ करून बाथरूममधुन बाहेर येवून घरात येवून पाहीले तर मुलगी घरात दिसली नाही. कपाटात ठेवलेले २०००/— रू व SBI बॅकेचे ATM दिसले नाही. तेव्हा आजुबाजुला शेजारी व घरमालककाकडे तिची चौकशी केली आणि तिच्या मैत्रिणीकडे तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला असता मिळुन आली नाही. फिर्यादीचे मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रेजिवाड मॅडम ९७६५८३७०६९ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**